मेहकर शहराला औद्योगिक धंद्यासह सर्वांगिण सुंदर करु >> पान 2
अन् प्रा. अशीष रहाटे बनले ऑटोचालक >> पान 3
केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत वाशिम येथे ७ डिसेंबरला होणार राज्यस्तरीय १०० दिवशीय क्षयरोग मुक्त भारत मोहीमेचा शुभारंभ >> पान 4

**सुविचार**
वेळेची किंमत ओळखा आणि त्याचा योग्य वापर करा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




घटस्फोटाच्या खटल्यामुळे जगभर राहिली चर्चेत; प्रसिद्ध अभिनेत्री लग्न न करताच दुसऱ्यांदा होणार आई
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 117 ■ शनिवार, दि. 07 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## विशेष अधिवेशन आजपासून: नव्या सदस्यांना शपथ,सोमवारी विधानसभा अध्यक्षांची निवड

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य विधानसभेत निवडून आलेल्या सदस्यांचा शपथविधी, अध्यक्षांची निवड यासाठी उद्यापासून (शनिवार) विधानसभेच्या तीन दिवसीय अधिवेशनाला सुरुवात होत आहे. यासाठी भाजपचे ज्येष्ठ आमदार कालिदास कोळंबकर यांना हंगामी अध्यक्ष म्हणून शुक्रवारी शपथ देण्यात आली.

१५व्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनास शनिवारपासून सुरुवात होत आहे. शनिवार व रविवार अशा दोन दिवसांत सर्व २८८ सदस्यांचा शपथविधी पार पडेल. सोमवारी सकाळी विधानसभा अध्यक्षांची निवडणूक होईल. त्यानंतर राज्यपालांचे नवीन विधानसभेपुढे अभिभाषण होईल. अखेरच्या सत्रात पुरवणी मागण्या, विधेयके सादर केली जातील.

विधानसभेच्या अधिवेशनासाठी विधान भवनात रंगरंगोटी करण्यात आली आहे. प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यावर लॉबीचा भाग चकाचक करण्यात आला आहे. मावळते विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचीच अध्यक्षपदी फेरनिवड करण्यात येणार आहे. रविवारी ते आपला उमेदवारी अर्ज दाखल करतील, असे सांगण्यात आले.

**७८ जणांची पहिल्यांदा शपथ**

१५व्या विधानसभेत ७८ सदस्य हे पहिल्यांदाच निवडून आले आहेत. या नवीन चेहऱ्यांमध्ये भारतीय जनता पक्षाचे ३३, शिवसेना (एकनाथ शिंदे) १४, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) ८, शिवसेना (उद्धव ठाकरे) १०, काँग्रेस ६ आणि राष्ट्रवादीच्या (शरद पवार) चार सदस्यांचा समावेश आहे. त्याशिवाय तीन अपक्ष व किंवा छोट्या पक्षांच्या सदस्यांचा समावेश आहे. सदस्यांना सभागृहात बोलणे किंवा भाषण करण्यासाठी ही शपथ घ्यावी लागते.

**कालिदास कोळंबकर हंगामी अध्यक्ष**

विधानसभेतील सर्वांत ज्येष्ठ सदस्य कोळंबकर यांची हंगामी अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवनात झालेल्या छोटेखानी समारंभात शपथ दिली. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मुख्य सचिव सुजाता सौनिक आदी उपस्थित होते. कोळंबकर हे शिवसेना, काँग्रेस व भाजप अशा तीन पक्षांकडून आतापर्यंत नऊ वेळा विधानसभेवर निवडून आले आहेत.



## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे छ. संभाजीनगर मध्ये आगमन व स्वागत



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विमानतळावर आगमन झाले.त्यांच्या समवेत आ. गिरीश महाजन, आ. प्रवीण दरेकर, आ. अभिमन्यू पवार हे ही होते. कार्यकर्तेच्यावतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड, खा. संदीपान भुमरे, आ. अतुल सावे, आ. अनुराधा चव्हाण तसेच विभागीय आयुक्त दिलीप गावडे, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना तसेच अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. त्यानंतर ते एका विवाह सोहळ्यास उपस्थित राहण्याकरीता रवाना झाले.

## विरोधी पक्षनेत्या विना विधिमंडळाचे कामकाज चालू शकते- अनंत कळसे



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड यश मिळाले तर महाविकास आघाडीला अपयश आले. विरोधी पक्षांकडे संख्याबळ नसल्यामुळे विधिमंडळात विरोधी पक्षनेते विनाच कामकाज चालू ठेवावे लागणार आहे. विरोधी पक्षनेता नसेल तर विधिमंडळ कामकाज कसं चालेल असा सवाल आता उपस्थित होतोय. मात्र हेच विधिमंडळ कामकाज विरोधी पक्षनेते शिवाय चालू शकतं असे ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ अनंत कळसे यांनी सांगितले आहे.

## आम्ही अधिकृतरित्या गृहमंत्री पदाची मागणी केली नव्हती; शिवसेना प्रवक्ते राजू वाघमारे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मंत्रिमंडाळाचा विस्तार नागपूर अधिवेशनाच्या आधी होईल, आम्ही अधिकृतरित्या गृहमंत्री पदाची मागणी केली नव्हती, असे कधी एकनाथ शिंदे बोलले नाहीत. ते जो काही निर्णय घेतील तो सगळ्यांना मान्य आहे.अशी माहिती शिवसेना प्रवक्ते राजू वाघमारे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी अधिक माहिती देताना ते म्हणाले की, महापरिनिर्वाण दिनानिमित्त माझे एकच सांगणे आहे.महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जगातील एकमेव व्यक्ती आहेत की,ज्याच्या महापरिनिर्माण दिनी लोक न सांगतात एकत्र येऊन त्यांना विनम्र अभिवादन करतात. यावर त्या महापुरुषाच काम किती महान आहेत हे कळून येते, या देशाला लोकशाहीच्या मार्गाने घेऊन जाण्याच सगळ्यात मोठे काम बाबासाहेबांनी केले. आपण संविधानाचे रक्षण करण्याची आपण शपथ घेऊन त्यांना अभिवादन केले पाहिजे,असे ते म्हणाले तर मंत्रिमंडाळाचा विस्तार नागपूर अधिवेशनाच्या आधी होईल, आम्ही अधिकृतरित्या गृहमंत्री पदाची मागणी केली नव्हती, असे कधी एकनाथ शिंदे बोललेही नाहीत. ते जो काही निर्णय घेतील तो सगळ्यांना मान्य आहे.अशी माहिती शिवसेना प्रवक्ते राजू वाघमारे यांनी दिली.

# नदीजोड प्रकल्प आणि हरित ऊर्जा निर्मितीवर सर्वाधिक भर

### देवेंद्र फडणवीस यांनी मांडले महाराष्ट्राच्या विकासाचे नवे व्हिजन

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याच्या विकासासाठी अनेक गोष्टी करायच्या आहेत. पण नदीजोड प्रकल्प आणि हरित ऊर्जा निर्मितीवर सर्वाधिक भर राहणार आहे, असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी महाराष्ट्राच्या विकासाचे नवे व्हिजन मांडले. शुक्रवार, ६ डिसेंबर रोजी झालेल्या दुरदर्शन सह्याद्री वाहिनीवरील मुलाखतीत ते बोलत होते. वरिष्ठ पत्रकार नवनाथ बन यांनी ही मुलाखत घेतली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अडीच वर्षे आमच्या सरकारने अत्यंत वेगाने महाराष्ट्राला पुढे आणले. आम्ही सुरु केलेल्या योजना आणि प्रकल्प पुढे नेण्यासाठी महाराष्ट्र आता थांबणार नाही. अनेक गोष्टी करायच्या आहेत. सर्व योजनाही सुरु ठेवायच्या आहेत. पण नदीजोड प्रकल्पांवर माझा सर्वात जास्त भर राहणार आहे. पाटबंधारे मंत्री म्हणून मी चार प्रमुख नदीजोड प्रकल्पांना मान्यता दिली आहे. हे प्रकल्प महाराष्ट्राला कायम दुष्काळातून मुक्त करु शकतात. त्यामुळे नदीजोड प्रकल्पांवर माझा भर राहील. त्याचप्रमाणे हरित ऊर्जेवरही माझा भर राहणार आहे. मागच्या काळात आम्ही जवळपास ५४ हजार मेगा वॅटचे वेगवेगळे प्रकल्प हाती घेतले आहेत. या प्रकल्पांमुळे २०३० साली महाराष्ट्रातील ५२ टक्के वीज अपारंपारिक स्त्रोतातील असणार आहे. शेती आणि उद्योग क्षेत्राला या प्रकल्पाचा प्रचंड फायदा होणार आहे. या दोन प्रकल्पांमुळे महाराष्ट्रात रोजगाराची निर्मिती होईल आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

मुंबईसाठी कोणत्या योजना?

मुंबईच्या विकासाच्या आराखड्याबाबात बोलताना ते म्हणाले की, मुंबईच्या कुठल्याही भागातून कुठेही पोहोचायला एक तासापेक्षा कमी वेळ लागायला हवा, अशी घोषणा मी २०१६ ला केली होती. त्यादृष्टीने आम्ही पुढे जात आहोत. आता कोस्टल रोड, वरळी-वांद्रा सी लिंक झाला. त्यापुढे वांद्रे-वर्सोवा सी लिंकचे काम सुरु आहे. वर्सोवा-मढचे टेंडर दिले आहे. मढपासून विरारपर्यंत एक सी लिंक तयार करायची आहे. त्यासाठी मी मध्यंतरी जपानला गेलो होतो आणि जपान सरकारने त्यासाठी ४० हजार कोटी रुपये देण्याचे कबुल केले आहे. आम्हाला लवकरच ते काम सुरु करायचे आहे. यामुळे मुंबईची वाहतूक कोंडी कमी होईल. यासोबतच बीडीडी चाळ, अभ्युदय नगरसारख्या योजना, म्हाडा या सगळ्यात आम्ही खूप मोठ्या प्रमाणात काम केले. मराठी माणसाला मुंबईतच घर मिळावे यासाठी प्रयत्न केले. इथली रहिवास ही समस्या सुटणार आहे. मुंबईत अनेक मर्यादा आहेत पण अटल सेतूमुळे मुंबईच्या तीन पट मोठी मुंबई जुळली आहे. त्यामुळे लोकांना परवडणारी घरे देणे सोपे झाले आहे. पुढच्या काही वर्षात सामान्य मुंबईकरांचे परवडणाऱ्या घरांचे स्वप्न पुर्ण करता येणार आहे, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

धारावी पुनर्विकास प्रकल्पाबाबत बोलताना मुख्यंत्री फडणवीस म्हणाले की, धारावी प्रकल्पाची संकल्पना राजीव गांधींच्या काळात मांडली होती. पण कुठल्याच सरकारने काहीच केले नाही. मी मुख्यमंत्री झाल्यानंतर त्या प्रकल्पाचा डीपीआर तयार केला. रेल्वेची जागा विकत घेतली. या प्रकल्पाचे टेंडर काढले आणि विकासक नेमला. पण महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर त्यांनी हे टेंडर रद्द केले आणि त्यात नव्याने नियम तयार केले. आताच्या टेंडरमध्ये १०० टक्के नियम उद्धव ठाकरेंच्या सरकारने तयार केलेत. २०११ पर्यंतच्या पात्र लोकांना या योजनेतून धारावीमध्येच घर देणार आहोत. पण जे लोक नियमात बसत नाहीत त्यांच्यासाठी भाड्याच्या घराची व्यवस्था करणार आहोत. त्या घरात ते ११-१२ वर्षे राहिल्यानंतर त्यात थोडे पैसे भरून त्यांच्या नावावर त्यांना मिळेल. गरीब माणसाला आम्ही त्यांचे घर देत आहोत.



# राज्यभरात थंडी पुन्हा परतणार

**मुंबई/प्रतिनिधी :** ऐन हिवाळ्यात राज्यात कमाल तापमान ३० अंशांवर तर किमान तापमान २० अंशांवर गेले आहे. उष्मा वाढल्यामुळे गेली तीन दिवस असह्य उकाड्याचा सामना करावा लागत आहे. मात्र, सोमवारपासून तापमानात चार ते पाच अंश सेल्सिअसने घट होऊन काहिसा दिलासा मिळणार आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, फेंगल चक्रीवादळामुळे राज्यात बाष्पयुक्त वारे आल्यामुळे ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. हवेत बाष्पाचे किंवा आर्द्रतेचे प्रमाण वाढून उकाडा वाढला होता. नाशिक, नगर, पुण्यात नऊ अंशांवर गेलेले किमान तापमान वाढून थेट १९ अंशांपर्यंत आले होते. तर कमाल तापमान राज्यभरात सरासरी ३० अंशांपर्यंत वाढले होते. आर्द्रता वाढल्यामुळे किमान तापमानात दहा अंश सेल्सिअसने वाढ झाली होती. कमाल तापमानातही सरासरी पाच अंश सेल्सिअसने वाढ झाली होती. त्यामुळे राज्याच्या बहुतांश भागात असाह्य उकाडा जाणवत होता.

हवेतील आर्द्रता हळूहळू कमी होत आहे. पश्र्चिमी विक्षोप सक्रीय होण्याचा अंदाज आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्याचा जोर वाढून शनिवारपासून (७ डिसेंबर) तापमानात घट होण्यास सुरूवात होईल. सोमवारी (९ डिसेंबर) कमाल - किमान तापमानात चार ते पाच अंश सेल्सिअसने घट होऊन, थंडीत वाढ होईल. त्यामुळे सोमवारपासून राज्यभरात उकाड्यापासून काहिसा दिलासा मिळण्याचा अंदाज आहे, अशी माहिती हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी दिली.

राज्यात शुक्रवारी चंद्रपूर येथे सर्वांत कमी १७.२ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. सोलापूर येथे ३४.७ अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली आहे. किनारपट्टीवर मुंबईत ३२.६, सांताक्रुज ३४.४, रत्नागिरी ३४.५ आणि डहाणूत ३०.१ अंश सेल्सिअस कमाल तापमान होते. किमान तापमान चंद्रपूर खालोखाल नागपुरात २०.६, पुण्यात १९.८, नगरमध्ये २१.५, छत्रपती संभाजीनगरमध्ये २२.० आणि कोल्हापुरात २२.७ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली.



**मालेगाव बँक खात्यांद्वारे कोट्यावधींचे गैरव्यवहार प्रकरण**

# ईडीचे मुंबई व अहमदाबादमध्ये छापे, १३ कोटी ५० लाखांची रोख रक्कम जप्त

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मालेगाव येथील व्यापाऱ्याने दोन बँकांमध्ये १४ खाती उघडून त्यातील रकमेचा निवडणुकीसाठी कथित गैरवापर केल्याप्रकरणी सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) शुक्रवारी मुंबई व अहमदाबाद येथील सात ठिकाणी छापे टाकले. त्यात मुंबईतील अंगडिया व्यवसायिकाशी संबंधित एका ठिकाणाचा समावेश आहे. या कारवाईत १३ कोटी ५० लाख रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे.

हा गैरव्यवहार १२०० कोटी रुपयांचा असल्याचा संशय असून बनावट कंपनीद्वारे २१ बँक खात्यांतून करण्यात आलेल्या ८०० कोटी रुपयांच्या व्यवहारांची माहिती ईडीला मिळाली आहे. त्यातील बहुसंख्य कंपन्या एकल मालकी असून त्या नवी मुंबई, सूरत,अहमदाबाद, उत्तर प्रदेश व दिल्ली येथील असल्याचे सूत्रांनी सांगितले.

या प्रकरणात राजकीय पक्ष व व्यक्तीच्या सहभागाबाबतही ईडी तपास करीत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मालेगाव येथील सिराज अहमद हारून मेमन याने नाशिकमधील दोन बँकांमध्ये सुमारे १४ बँक खाती उघडली होती. त्यातील गैरव्यवहाराप्रकरणी मेमनला स्थानिक पोलिसांनी अटक केली होती. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी या प्रकरणाला ‘वोट जिहाद फंडिंग’ गैरव्यवहार असे म्हटले आहे. तसेच या बेनामी बँक खात्यांमधून पैसे काढून निवडणुकीत गैरवापर केल्याचा आरोप केला आहे. आरोपी सिराजने मालेगावमधील नाशिक मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेत अनेक बँक खाती उघडली होती. यामध्ये नागरिकांच्या केवायसी कागदपत्रांचा वापर करून त्यांनी शेतकऱ्यांना पैसे पाठवण्यासाठी नवा व्यवसाय सुरू करत असल्याचे भासवले होते. याप्रकरणी ईडीने शुक्रवारी अहमदाबाद येथील ६ व मुंबईतील एका ठिकाणी छापे टाकले आहेत. या कारवाईत मुंबईतील अंगडियाच्या ठिकाणावर छापे टाकण्यात आले आहेत. याप्रकरणी १३ कोटी ३० लाख रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.



याप्रकरणी ईडीच्या तपासानुसार, मालेगाव येथील १४ बँक खात्यांमधून एकल मालकी कंपन्याच्या २१ बँक खात्यावर ९५ कोटी रुपये जमा करण्यात आले होते. तपासात नवी मुंबई, सूरत,अहमदाबाद, उत्तर प्रदेश व दिल्ली येथील २१ बनावट कंपन्यांची माहिती मिळाली असून त्यांच्या बँक खात्यात गेल्या तीन ते चार महिन्यात ८०० कोटी रुपये व्यवहार केल्याचे तपासात निष्पन्न झाले. तपासानुसार नागाणी अक्रम मोहम्मद शफी व वासिम वलीमोहम्मद भेसानिया यांनी बनावट खात्यामधून मोठ्या प्रमाणत रक्कम काढण्याचे समजते. तसेच मुंबई, अहमदाबाद व सूरतमधील हवाला व्यावसायिकांनीही या खात्यातील रक्कम काढल्याचे ईडीच्या तपासात निष्पन्न झाले आहे. ते मेहमूद भागड ऊर्फ चॅलेंजर किंग ऊर्फ एमडी याच्या सांगण्यावरून काम करत होते, असे चौकशीत सांगितले. त्यानुसार नागाणी अक्रम शफी व वासिम भेसानिया यांना ईडीने अटक केली आहे.

# मेहकर शहराला औद्योगिक धंद्यासह सर्वांगिण सुंदर करू

## नवनिर्वाचित आ. सिद्धार्थ खरात यांचा विश्वास : शहराला नावारुपाला आणू





दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी : निवडणूक काळात मी मेहकर मतदार संघात नवे व्हीजन घेऊन काम करण्याचा मानस व्यक्त केला होता.त्यानुसार विधानसभेचा निकाल लागल्यानंतर अवघ्या दहा ते बारा दिवसात कामाला प्रारंभ केला आहे.अधिकारी यांनी सुचना केल्या असून कामे गतीने करण्यासाठी बैठकांना सुद्धा प्रारंभ केला आहे. मेहकर शहरातील समस्या सोडविण्याबरोबरच शहराला औद्योगिक धंद्यासह सर्वांगिण सुंदर करू असा विश्वास नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केला.**

माध्यमांशी बोलाना आ.सिद्धार्थ खरात म्हणाले की, मेहकर शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा जो काही आश्र्वास पुतळा उभा करायचा आहे, त्यासाठीच सौंदर्यकरणाचे व चबुतरा बसवण्याचे काम सुरू आहे. या संदर्भात पाहणी केली.हे काम १९ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याचा आमचा मानस आहे. त्या दृष्टीने काम कामाला गती दिली जात आहे.यासाठी सार्वजनिक निधी गोळा करून करायची आहे. या सार्वजनिक समितीमध्ये सहभागी होऊन पुतळा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे.छत्रपती शिवाजी महाराजांचा अतिशय सुंदर, मोहक आणि देखणा व मेहकर शहराचे वैभव वाढवेल अशा प्रकारच्या पुतळ्याचे काम आम्ही या ठिकाणी मार्गी लावणार आहोत. त्या अनुषंगाने जे काही सौंदर्यीकरणासाठी जो काही चपुतरा बांधण्याचे काम सुरू आहे. आतापर्यंत हे काम सुद्धा आम्ही अत्यंत संथ गतीने सुरू होते. आता हे काम लवकरात लवकर पूर्ण करून भव्यदिव्य देखणा सोबत मोहक आणि आपल्या सगळ्यांची शान आणि मान वाढवेल अशा प्रकारचा पुतळा जो आहे आपला छत्रपती शिवाजी महाराजांचा तो बसवण्यासाठी आणि कॉन्ट्रॅक्टला सुद्धा कडक सूचना देऊन त्यांना कामाला सुरुवात करायला सांगितले आहे. आमचा मानस आहे की १९ फेब्रुवारी पर्यंत इथे या ठिकाणी बांधकाम पूर्ण पूर्ण होऊन या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्याचा प्रयत्न राहणार आहे. त्याचा अनुषंगाने ऑर्डर देणे, पुतळा सिलेक्ट करणे, यापूर्वी समिती कठीण करणे, त्याचा निधी वर्ग गोळा जमा करणे,शासनाच्या परवानगी घेणे, या गोष्टी आम्हाला तातडीने करायचे आहेत. बसस्थानकाचे काम हे अत्यंत संथ गतीने सुरू असून आहे. गेल्या चार पाच वर्षापासून हा प्रश्न असाच प्रलंबित आहे.मेहकर शहर हे परिसरातील सर्वात मोठे शहर असून शहरातून सुमारे १०० बसेस धावतात. हजारो प्रवासी या बसेसचा फायदा घेतात. मात्र या ठिकाणी २०१७ ला नवीन बस स्टॅन्ड तयार करण्यासाठीची प्रशासकीय मान्यता मिळाली असताना अद्यापही हे काम पूर्ण झाले नाही.हे काम पूर्ण करण्यासाठी कॉन्टॅक्टला व अधिकार्यांना सुचना केल्या आहेत.या ठिकाणी मोबाईल टॉयलेट सह इतर सुविधा उपलब्ध करण्याच्या सुचना केल्या आहेत. एमआयडीसीची जी जागा आहेत त्यातील चार पाच एकर सोडली तर ती सगळी जागा अतिक्रमण केलेली आहे. या ठिकाणी सुविधा निर्माण करून व्यतिरिक्त पाचशे एकर ची जागा आपण महसूल विभागाकडे मागितलेली आहे. ५० गावांच्या शेतकऱ्यांना या पेनटाकळीचा प्रकल्पाचा फायदा होणार आहे.मेहकर लोणार विधानसभा मतदार संघाच्या सर्वांगिण विकासासाठी मी बोललो त्या प्रमाणे कामाला अवघ्या बारा ते तेरा दिवसात प्रारंभ केला असून मेहकर लोणार मतदारसंघात औद्योगिक धंद्यांसह सर्वांगिण सुविधा निर्माण करण्यासाठी प्रारंभ करण्यात आला आहे. अशी माहिती आ. सिद्धार्थ खरात यांनी दिली.तसेच यावेळी त्यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्र्नांना समाधानकारक उत्तर देत सदर प्रश्र्न तात्काळ निकाली काढण्यासाठी आपले प्रयत्न राहणार असल्याचे सांगितले.

## महिला आमदारांची संख्या नगण्य

भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी निम्मी लोकसंख्या महिलांची आहे. चूल आणि मूल ही महिलांची जुनी ओळख आता पुसली गेली आहे. महिला आज कोणत्याच क्षेत्रात मागे नाहीत. सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहे म्हणूनच सर्व क्षेत्रात महिलांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले आहे मात्र एक क्षेत्र असे आहे ज्यात आजही महिलांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नाही ते क्षेत्र म्हणजे राजकारण. राजकारणात आजही महिला लोकप्रतिनिधींची संख्या पुरुषांच्या तुलनेत अतिशय नगण्य आहे आता हेच पहा ना नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत जिंकून आलेल्या महिला आमदारांची संख्या अतिशय नगण्य आहे. २८८ जागांसाठी एकूण २५० महिलांनी निवडणूक लढवली पण निवडून आल्या फक्त २१ महिला. याचाच अर्थ एकूण आमदारांपैकी महिला आमदारांची संख्या फक्त ७.२९ टक्के इतकी आहे. विशेष म्हणजे गेल्या विधानसभेत निवडून आलेल्या आमदारांची संख्या यापेक्षाही अधिक होती. मागील विधासभेत २४ महिला आमदार निवडून आल्या होत्या यावेळी ती संख्या ३ ने घटली आहे. यावेळी निवडून आलेल्या महिला आमदारांमध्ये भारतीय जनता पक्षाच्या सर्वाधिक १४ महिलांचा समावेश आहे. शिवसेना ( शिंदे ) गटाच्या २, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या ४ आणि काँग्रेसची १ महिला आमदार म्हणून जिंकून आली आहे. इतर पक्षामध्ये निवडून आलेल्या महिला आमदारांची संख्या शून्य आहे. वास्तविक ज्या देशात पंतप्रधान आणि राष्ट्रपती अशी महत्वाची पदे ज्या महिलांनी भोगली त्या देशात महिला लोकप्रतिनिधींची नगण्य संख्या भारतासारख्या पुरोगामी देशाला भूषणावह नाही. भारताच्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु या महिला आहेत. डॉ प्रतिभा ताई पाटील या देखील भारताच्या राष्ट्रपती राहिल्या आहेत. इंदिरा गांधी या महिला पंतप्रधानाने सर्वाधिक काळ देशाचे पंतप्रधानपद भूषवले. नुसतेच भूषवले नाही तर यशस्वीरीत्या सांभाळले आणि महिलांकडे देशाचे नेतृत्व दिले तर महिला काय करू शकतात हे दाखवून दिले. महिलांना जर राजकारणात पुरेसे प्रतिनिधित्व दिले तर महिला त्यांना दिलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडू शकतात हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे. देशात अशा अनेक महिला आहेत की ज्यांनी आपल्या नेतृत्वाने देशपातळीवर स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यात इंदिरा गांधी तर आहेतच पण त्यांच्यासोबत दिवंगत जयललिता, सुषमा स्वराज, शिला दीक्षित, ममता बॅनर्जी, उमा भारती, मायावती , वसुंधरा राजे यांनी आपापल्या राज्याचे मुख्यमंत्रीपद यशस्वीपणे सांभाळले. अनेक महिलांनी राज्यांचे राज्यपालपद भूषवले. महाराष्ट्रातून सुप्रिया सुळे, रक्षा खडसे या खासदारांनी राष्ट्रीय राजकारणात स्वतः ची वेगळी ओळख निर्माण केली आहे याचाच अर्थ जर राजकारणात महिलांना पुरेशी संधी मिळाली तर त्या त्यात यशस्वी होतात. दुर्दैवाने महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात आजही महिला आमदारांची संख्या अतिशय नगण्य आहे. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात अजून एकदाही महिला मुख्यमंत्री बनू शकली नाही यासारखी दुसरी शोकांतिका नाही. मुख्यमंत्रीच कशाला ? अगदी मंत्री बनणाऱ्या महिलांची संख्या देखील हाताच्या बोटावर मोजता येईल इतकीच आहे. मागील मंत्रिमंडळात तर अदिती तटकरे या एकमेव महिला मंत्री होत्या. यावेळी तरी ही संख्या वाढून मंत्रिमंडळात महिलांना पुरेसा स्थान मिळून त्यांचा योग्य मान राखला जाईल अशी अपेक्षा आहे. राजकारणात महिलांना ५० टक्के आरक्षण मिळावे अशी मागणी केली जाते त्या मागणीला सर्वच राजकीय पक्ष पाठिंबा देतात मात्र त्यासाठी पुढाकार घेण्याचे टाळतात. राजकारणात ५० टक्के आरक्षण मिळाले तर महिला राजकारणात आपल्या कर्तृत्वाचा झेंडा रोवतील यात शंका नाही. नाही म्हणायला स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ३३ टक्के आरक्षण आहे त्याचा फायदा महिलांना मिळाला आहे. ग्रामपंचायतिच्या सरपंचापासून जिल्हा परिषद अध्यक्ष, महापौर अशी महत्वाची पदे महिलांनी यशस्वीपणे भूषवली आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेप्रमाणे लोकसभा आणि विधानसभेतही महिलांना आरक्षण मिळाले तर महिला तिथेही आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवतील यात शंका नाही.

## माजी मंत्री मधुकरराव पिचड यांचे निधन

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी** : भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री मधुकरराव पिचड यांचे शुक्रवार, दि. ६ डिसेंबर रोजी निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते. आदिवासींच्या हक्कासाठी व्यापक लढा उभा करणारा नेता, अशी त्यांची ओळख होती.मुंबईतील जॉब्स

अहमदनगर जिल्ह्यातील राजूर येथील राहत्या घरी पिचड यांना ब्रेन स्ट्रोक आल्याने काही दिवसांपूर्वी त्यांना नाशिकच्या ९ पल्स रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, दीर्घ उपचारादरम्यान त्यांचे प्राणज्योत मालवली. मधुकरराव पिचड यांनी १९८० ते २००४ या काळात नगरमधील अकोले विधानसभा मतदारसंघातून विधानसभेचे आमदार म्हणून सलग सात वेळा विजय मिळवला. मार्च १९९५ ते जुलै १९९९ या काळात ते महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते होते.

मधुकर पिचड राजकीय कारकिर्दीच्या सुरुवातीला काँग्रेसमध्ये होते. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणूनही काम पाहिले आहे. २०१९ मध्ये त्यांनी मुलगा वैभव पिचड यांच्यासह भाजपमध्ये प्रवेश केला. पिचड यांनी १९६१ मध्ये अमृतसागर दूध सहकारी संघाची स्थापना केली. १९९३ मध्ये स्थापन झालेल्या अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे ते संस्थापक अध्यक्ष आहेत. १९७२ मध्ये जिल्हा परिषद सदस्य म्हणून आणि नंतर पंचायत समिती अकोले तालुका अध्यक्ष म्हणून निवडून आल्यापासून त्यांनी आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. १९८० पर्यंत त्यांनी काम केले.

२५ जून १९९१ रोजी आदिवासी विकास मंत्रालयाचे कॅबिनेट मंत्री म्हणून त्यांनी सुधाकरराव नाईक मंत्रालयात नोव्हेंबर १९९२ पर्यंत काम केले. मार्च १९९३ मध्ये आदिवासी विकास मंत्रालय, दुग्धविकास मंत्रालय , प्रवास विकास मंत्रालय आणि पशु, संवर्धन आणि मत्स्यव्यवसाय मंत्रालयासाठी कॅबिनेट मंत्री म्हणून पिचडांनी चौथ्या पवार मंत्रालयात मार्च १९९५ पर्यंत काम केले.

## डॉ. श्रीकर परदेशी मुख्यमंत्र्यांचे नवे सचिव



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :'झिरो पेंडन्सी'साठी परिचित असलेल्या भारतीय प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ अधिकारी डॉ. श्रीकर परदेशी यांची नियुक्ती मुख्यमंत्री कार्यालयात सचिव पदावर करण्यात आली आहे. याआधी ते उपमुख्यमंत्री कार्यालयात सचिव पदावर कार्यरत होते.

पंतप्रधान कार्यालयातील प्रतिनियुक्तीचा कालावधी संपल्यावर जून २०२१ मध्ये श्रीकर परदेशी महाराष्ट्रात परतले. त्यावेळी सिकॉमच्या व्यवस्थापकीय संचालक पदावर त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र महायुती सरकार सत्तेवर येताच त्यांच्याकडे उमुख्यमंत्री कार्यालयाच्या सचिव पदाचा कार्यभर सोपवण्यात आला आहे.

श्रीकर परदेशी हे मूळचे सांगली जिल्ह्यातील कवठेमहंकाळचे. एमबीबीएस–एमडी शिक्षण पूर्ण करत काही काळ त्यांनी प्रॅक्टिसही केली. २००१ साली यूपीएससी परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात त्यांनी महाराष्ट्रातून पहिले येण्याची किमया साधली होती. श्रीकर परदेशी यांनी जिल्हाधिकारी आणि महापालिका आयुक्त म्हणून अनेक जिल्ह्यात काम केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनाही त्यांच्या कामाची भुरळ पडली. त्यानंतर त्यांना थेट राजधानी दिल्लीत पंतप्रधान कार्यालयात उपसचिव पदावर नियुक्त करण्यात आले होते.

पिंपरी चिंचवड आयुक्तपदावर असताना वीसमजली इमारतींचे अतिक्रमण त्यांनी जमीनदोस्त केले, तेव्हा नागरिकांनी त्यांना 'बुलडोझर मॅन' अशी उपमा दिली होती. त्यांनी राज्य सरकारचा सर्वोत्कृष्ट जिल्हाधिकारी हा किताबही पटकावला आहे.

## जिल्हास्तरीय वरिष्ठ गट तलवारबाजी स्पर्धेची ८ डिसेंबरला निवड चाचणी

**हिंगोली/प्रतिनिधी** :जिल्हा स्तरीयवरिष्ठ गट तलवार बाजी स्पर्धेची निवड चाचणी आठ डिसेंबर रोजी होणार असल्याची माहिती निवड समितीने दिली आहे. महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशन यांच्या मान्यतेने नांदेड जिल्हा फेन्सिंग असोसिएशन यांच्या वतीने क्रीडा संकुल यशवंत महाविद्यालय नांदेड या ठिकाणी दिनांक १३ ते १५ डिसेंबर २०२४ या दरम्यान ३५ वी महाराष्ट्र राज्य वरिष्ठ गट फेन्सिंग स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेमध्ये हिंगोली जिल्ह्याचा मुलं व मुलींचा संघ यामध्ये सहभागी होणार आहे. या स्पर्धेत खेळाडू सहभागी होण्यासाठी खेळाडूची जन्मतारीख ३०.१०.२०११ अगोदरची असावी. ही स्पर्धा व निवड चाचणी दि. आठ डिसेंबर रोजी रविवारी अहिल्यादेवी होळकर विद्यालय वसमत, हिंगोली या ठिकाणी होणार असून आपण ठीक सकाळी ११:०० वाजता खेळाच्या गणवेशांमध्ये (पांढरा पोशाख) हजर राहावे. या संघाच्या निवड समिती सदस्य म्हणून संदीप वाघ, प्रा. नरेंद्र रायलवार, इरवंत बत्तलवाडीकर, कृष्णा देवणे, सोमनाथ हे राहणार असून हिंगोली जिल्हा फेन्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष कल्याण देशमुख, उपाध्यक्ष आनंद भट्ट कोषाध्यक्ष विजय जऊळकर संघटनेचे सचिव संजय भुमरे यांनी खेळाडूंना निवड चाचणी स्पर्धेसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# घटस्फोटाच्या खटल्यामुळे जगभर राहिली चर्चेत; प्रसिद्ध अभिनेत्री लग्न न करताच दुसऱ्यांदा होणार आई

हॉलीवूड अभिनेत्री अँबर हर्ड आणि तिचा पूर्वाश्रमीचा पती हॉलीवूड सुपरस्टार जॉनी डेप दीर्घकाळ कायदेशीर लढाई लढत होते. या गाजलेल्या खटल्याचा निकाल जॉनी डेपच्या बाजूने लागला. त्यानंतर अँबर प्रसिद्धी माध्यमापासून तशी दूरच होती. मात्र आता अँबरच्या बाबतीत एक खास बातमी समोर आली आहे. 'ॲक्वामॅन' चित्रपटातील भूमिकेसाठी प्रसिद्ध असलेल्या ३८ वर्षीय अँबर हर्ड दुसऱ्यांदा आई होणार आहे.

अँबर हर्डच्या घरी नवा पाहुणा येणार ही बातमी तिच्या प्रतिनिधीने 'पीपल' मासिकाशी बोलताना दिली आहे. त्यांनी सांगितले, सध्या अँबरच्या प्रेग्नंसीच्या सुरुवातीचा टप्पा आहे, त्यामुळे यावेळी फारशी माहिती देणं शक्य नाही. प्रतिनिधी पुढे म्हणाले, सध्या इतकंच सांगू शकतो की अँबर स्वतःसाठी आणि तिची पहिली मुलगी ओनाग पेजसाठी खूप आनंदी आहे.

अँबर हर्ड तीन वर्षांच्या मुलीची आई आहे. तिच्या मुलीचे नाव ओनाग पेज असून ती एप्रिल २०२१ मध्ये जन्माला आली होती. या मुलीचा जन्म सरोगसीच्या माध्यमातून झाला होता. मात्र, तिच्या दुसऱ्या बाळासाठीही तिने सरोगसीचा पर्याय निवडला आहे की नाही, याबाबत सध्या काही माहिती नाही. अभिनेता जॉनी डेपबरोबर घटस्फोट झाल्यानंतर चार वर्षांनी अँबरने तिच्या मुलीच्या जन्माची बातमी इन्स्टाग्राम पोस्टद्वारे जाहीर केली होती. तिने लिहिले होते, चार वर्षांपूर्वी मी निर्णय घेतला की मला मूल हवंय, आणि मला हे माझ्या अटींवर करायचं होतं. स्त्रिया आपल्या आयुष्याच्या इतक्या महत्त्वाच्या टप्प्याबाबत स्वतः निर्णय घेऊ शकतात हे मला आता जाणवतं.

अँबरने सिंगल मदर होण्याच्या निर्णयाचे सामान्यीकरण करण्यासाठी आणि महिलांना मातृत्वाबाबत स्वतंत्र निर्णय घेण्याचा अधिकार आहे हे पटवून देण्याचे महत्त्व सांगितले होते. ती म्हणाली होती, लग्नाशिवाय मूल होण या गोष्टीचं सामान्यीकरण होणं आवश्यक आहे.

अँबर हर्ड आणि अभिनेता जॉनी डेप २०१५ ते २०१७ दरम्यान वैवाहिक बंधनात होते. त्यांच्या वादग्रस्त नात्याचा शेवट २०२२ मध्ये चर्चित न्यायालयीन प्रकरणाने झाला, तेव्हा जॉनी डेपने अँबर हर्डविरोधात ५० दशलक्ष डॉलरचा मानहानीचा दावा दाखल केला होता. सहा आठवड्यांच्या खटल्याचा निकाल डेपच्या बाजूने लागला, आणि हर्डला १० दशलक्ष डॉलर नुकसानभरपाई व ५ दशलक्ष डॉलर दंडात्मक भरपाई देण्याचे आदेश देण्यात आले.

या चर्चित खटल्यानंतर अँबरने स्पेनमध्ये शांत आयुष्य जगायला सुरुवात केली आहे. ती नुकतीच हॅलोविनच्या दिवशी तिच्या मुली ओनागबरोबर 'ट्रिक ऑर ट्रीटिंग' करताना दिसली. सध्या तिच्या दुसऱ्या बाळाबद्दल फारशी माहिती उघड झालेली नसली तरी तिच्या चाहत्यांनी सोशल मीडियावर अभिनंदनाचा वर्षाव करत अँबर आणि ओनागसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### सुंदरनगर, गवारे नगर येथे विद्युत डिपीच्या समस्येने नागरीक त्रस्त



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** जालना शहरातील सुंदर नगर, गवारे नगर येथील विद्युत डीपीच्या विविध समस्येने नागरिक त्रस्त झाले आहेत. अनेक वेळा महावितरणच्या उपअभियंताकडे तक्रारी करूनही महावितरणचे अधिकारी लक्ष देत नाहीत तसेच त्यांनी चंदनझीरा, सुंदरनगर ,गवारे नगर येथील नागरीकांच्या समस्या जाणून घेतल्या नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. गवारे नगर येथील दक्षिण मुखी चौक येथे विद्युत रोहित्र असून हे रोहित्र जमीनीलगत असल्याने या ठिकाणी लहान लेकरांच्या जीवितास धोका असून २४ तास फ्यूज उघडे असतात या डीपीवर नेहमी शार्ट सर्किट होत असते तसेच याबाबतीत अनेक वेळा महावितरणच्या अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना नागरिकांनी तक्रारी केलेल्या आहेत परंतु कोणीही याकडे लक्ष द्यायला तयार नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तसेच गवारे नगर-सुंदरनगर ते महामार्गापर्यंत मुख्य डीपी रस्त्याचे काम सध्या चालू आहे. परंतु या रोहित्राची उंची अत्यंत कमी म्हणजेच जमीनीलगत असल्यामुळे रोडचे काम रखडलेले आहे. लवकरात लवकर या विद्युत डीपीच्या तसेच याच प्रकारे तीन ते चार डीपीची समस्या आहेत त्या लवकरात लवकर सोडवाव्यात अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### नाताळदिवशी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणारी परीक्षा पुढे ढकलावी, अल्फा ओमेगा ख्रिश्चन महासंघाचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला पत्र



दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी** : नाताळा दिवशी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणारी परीक्षा पुढे ढकलावी याचे पत्र अल्फा ओमेगा ख्रिश्र्चन महासंघाने लोकसेवा आयोगाला दिले आहे. २५ डिसेंबर रोजी ख्रिसमसच्या दिवशीच सामायिक चाचणी परीक्षा घेण्याचे एमपीएससीने जाहीर केले. मात्र ही परीक्षा पुढे ढकलली जावी, अशी भूमिका अल्फा ओमेगा ख्रिश्र्चन महासंघाने घेतली आहे. या बाबतचा पत्रव्यवहार लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांकडे करण्यात आला. या परीक्षेत अनेक ख्रिश्र्चन विद्यार्थी देखील बसलेले आहेत. त्यामुळे हा सण विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचा आहे. याच दिवशी घेण्यात येणारी परीक्षा पुढे ढकलली जावी अशी विनंती या माध्यमातून करण्यात आली आहे.

### छत्रपती संभाजी नगर जालना महामार्गावर कंटेनर आणि बसचा अपघात



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर जालना मार्गावर आज सकाळी छत्रपती संभाजी नगर ते जालना महामार्गावर सुसाट वेगाने जाणाऱ्या कंटेनर व बसचा अपघात झाला आहे. कंटेनर व बस हे दोघेही जालन्याच्या दिशेने जात होते बस ही कंटेनरला ओव्हरटेक करत असताना कंटेनर नंबर चक२० ऊए ९७८३ अचानक कंटेनरचा वेग कमी झाला आणि ओव्हरटेक करताना पाठीमागून बस त्यावर धडकली. यात कंडक्टर साईडच्या भागाचे जास्त नुकसान झाला आहे. हा अपघात सटाणा फाट्याजवळ झाला असून बसमधील ७ प्रवासी जखमी झाल्याची प्राथमिक माहिती देण्यात आली आहे.

### देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेताच औंढा येथे कार्यकर्त्यांचा जल्लोष

दैनिक आपला विदर्भ

**औंढा नागनाथ/प्रतिनिधी** : राज्याच्या मुख्यमंत्री पदाची देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेताच औंढा नागनाथ शहरातील मंदिर परिसरात गुरुवारी सायंकाळी सव्वा सहा वाजता दिग्विजय बायस यांच्या नेतृत्वाखाली ढोल ताशा वाजवत एकमेकांना पेढे भरून फटाक्याची आतिषबाजी करत जल्लोष करण्यात आला.

यावेळी भाजपा युवा कार्यकर्ते दिग्विजय बायस, विक्की देशमुख, नितीन मुळे, पंजाब मुळे, महेश खंदारे, नागनाथ देशमुख, राजेश खंदारे, विलास कांबळे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# अन् प्रा. अशीष रहाटे बनले ऑटोचालक

## कोणतेही काम कमीपणाचे नाही : फक्त जिद्दीने पूर्ण करून यशस्वी व्हा

दैनिक आपला विदर्भ







देविदास खनपटे
मुख्य संपादक

**मेहकर :** धर्मवीर स्व.दिलीपराव रहाटे यांनी बुलढाणा जिल्ह्यात शिवसेनेची पानेमुळे रोवून बुलढाणा जिल्हा हा शिवसेनेचा बालेकिल्ला केला आहे. तो फक्त आपल्या जिद्दीच्या बळावर. स्व.दिलीपराव रहाटे यांनी युवकांना सोबत घेऊन शिवसेना उभी केली, त्याचबरोबर प्रत्येक युवकाला काम करण्याची प्रेरणा देत कोणतेही काम लहान मोठे नाही ते फक्त जिद्दीने करा व त्यामध्ये यशस्वी व्हा असा संदेश दिला. त्यांच्या मार्गदर्शनात अनेक जण उच्च शिखरापर्यंत पोहोचले आहेत. स्व. धर्मवीर दिलीपराव रहाटे यांच्याच कार्याचा वसा त्यांचे पुत्र प्रा.आशिष रहाटे हे पुढे नेत असून कोणतेही काम छोटे किंवा मोठे नाही ते काम जिद्दीने करा आणि त्यामध्ये यशस्वी व्हा असा संदेश प्रा.आशिष रहाटे यांनी चक्क ऑटो चालवून युवकांना दिला आहे. स्व. दिलीपराव रहाटे यांच्याप्रमाणे प्रा.आशिष रहाटे यांचेही विचार युवकांना प्रेरणादायी ठरत आहेत.

मेहकर लोणार विधानसभा मतदार सघाचे नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात हे मेहकर येथील एमआयडीसीचा एरिया पाहण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांच्यासोबत शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते होते. आमदार सिद्धार्थ खरात हे एमआयडीसीचा एरिया पाहण्यासाठी गेले असल्याची माहिती मिळाल्याने होतकरू नवउद्योजक होऊ पाहात असलेल्या युवकांनी एमआयडीसीमध्ये जाऊन आ. सिद्धार्थ खरात यांच्यासोबत संवाद साधला. यावेळी त्या ठिकाणी एक ऑटो घेऊन युवक आला. प्रा. आशिष रहाटे यांचा तो चाहता असल्याने त्यांनी प्रा.आशिष रहाटे यांना चक्का ऑटो चालवण्याची गळ घातली आणि प्रा.अशीच रहाटे यांनीही कोणताही कमीपणा न वाटू देता चक्क आटोच्या स्टेरिंगवर बसत ऑटो चालविला.

यावेळी त्यांनी युवकांना संदेश देताना कोणतेही काम लहान किंवा मोठे नसते, आपल्या ठिकाणी आपले काम हे मोठेच असून ते फक्त जिद्दीने पूर्ण करा, त्यामध्ये यशस्वी होण्यासाठी स्वतःला झोकून देऊन प्रचंड मेहनत करा आणि आपल्या क्षेत्रात एक यशस्वी व्यक्ती बना असा संदेश दिला. धर्मवीर स्व.दिलीपराव रहाटे यांनी संपूर्ण आयुष्य हे समाजसेवेसाठी व समाजाच्या उद्धारासाठी खर्च केले आहे. त्यामुळे त्यांना बुलढाणा जिल्ह्यात धर्मवीर म्हणून ओळखले जाते. स्व.दिलीपराव रहाटे यांनी जिल्ह्यातील गावागावात घराघरात व घरातील प्रत्येकाच्या मनामना शिवसेनेचे आदराचे स्थान निर्माण केले आहे. त्यांच्याच कार्याचा वसा त्यांचे पुत्र प्रा. आशिष रहाटे पुढे चालवत असून त्यांच्या या कार्याबद्दल त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

# केरळचे राज्यपाल आरिफ खान यांचं भगवद्गीतेबद्दल मोठं विधान; म्हणाले, हा भारताचा महत्त्वाचा भाग



**केरळ :** केरळचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी गुरुवारी (५ डिसेंबर २०२४) हरियाणातील कुरुक्षेत्र विद्यापीठात ९ व्या आंतरराष्ट्रीय गीता परिषदेला संबोधित केलं. या आंतरराष्ट्रीय गीता परिषदेत हरियाणाचे राज्यपाल बंडारू दत्तात्रेय आणि उत्तराखंडचे राज्यपाल गुरमीत सिंह यांनी देखील सहभाग घेतला होता. मात्र, केरळचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी या गीता परिषदेला संबोधित करताना भगवद्गीतेचे वर्णन भारताच्या सांस्कृतिक इतिहासाचा वारसा आणि संपूर्ण मानवतेच्या कल्याणासाठी धर्मग्रंथ म्हणून केले. तसेच भारताच्या सांस्कृतिक वारशाचा एक महत्त्वाचा भाग असल्याचं म्हटलं आहे.

आरिफ मोहम्मद खान यांनी काय म्हटलं?

हरियाणातील कुरुक्षेत्र विद्यापीठात गीता परिषदेला संबोधित करताना राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी जागतिक पर्यावरण संरक्षणात भगवद्गीतेचं महत्त्व सांगितलं. तसेच भगवद्गीतेचा संदेश जगभर पोहोचवण्याचं आवाहन देखील त्यांनी केलं. तसेच गीतेत उपनिषद आणि वैदिक ग्रंथांची मूलभूत तत्त्वे असून जी भारताची एकता आणि अखंडता दर्शवतात. भगवद्गीतेमधून मानवतेचा फायदा होईल, केवळ भगवद्गीताच मानवतेचे कल्याण करेल, असं आरिफ मोहम्मद खान यांनी म्हटलं. यासंदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

तसेच आरिफ मोहम्मद खान यांनी पर्यावरण संवर्धनाला चालना देण्यासाठी गीतेच्या भूमिकेवर भर दिला आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश जगभर पसरवला गेला पाहिजे असंही म्हटलं. तसेच हरियाणाचे राज्यपाल बंडारू दत्तात्रेय यांनी या गीता परिषदेला संबोधित करताना गीतेचा पर्यावरण रक्षणाचा संदेश आणि मानवी जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठीचं महत्त्व अधोरेखित केलं. 'भगवद्गीता हा सर्व मानवतेच्या कल्याणासाठी पवित्र ग्रंथ असल्याचं राज्यपाल बंडारू दत्तात्रेय यांनी म्हटलं.

तसेच उत्तराखंडचे राज्यपाल गुरमीत सिंह यांनी या संबोधित करताना म्हटलं की, भगवद्गीता लोकांना संकटाच्या वेळी योग्य निर्णय घेण्यास मदत करते. तसेच भगवद्गीतेची शिकवण आणि हरियाणाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा प्रचार करण्यासाठी कुरुक्षेत्र विद्यापीठाच्या प्रयत्नांचीही गुरमीत सिंह यांनी प्रशंसा केली.



### कोकण रेल्वेवर दोन दिवसीय ब्लॉक, मडगावसह दोन रेल्वेगाड्यांवर परिणाम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : कोकण रेल्वे मार्गावर देखभाल-दुरुस्तीची कामे करण्यासाठी ७ आणि ८ डिसेंबर रोजी करमळी - वेर्णास्थानकांदरम्यान ब्लॉक घेण्यात येणार आहे. या ब्लॉकमुळे प्रामुख्याने चंदीगड - तिरुवनंतपुरम सेंट्रल एक्स्प्रेस, नागपूर-मडगाव एक्स्प्रेसच्या वेळापत्रकावर बदल केला आहे. तर, इतर रेल्वेगाड्यांच्या वेळापत्रकावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

कोकण रेल्वेच्या करमळी - वेर्णा विभागात ७ डिसेंबर रोजी दुपारी ४.१० ते सायंकाळी ५.५५ वाजेपर्यंत ब्लॉक घेण्यात येणार आहे. या कालावधीत अनेक रेल्वेगाड्यांना लाल सिग्नल दाखवला जाणार आहे. ब्लॉक कालावधीत गाडी क्रमांक १२२१८ चंदीगड - तिरुवनंतपुरम सेंट्रल एक्स्प्रेस करमळी स्थानकाच्याआधी ४५ मिनिटे थांबवण्यात येईल. गाडी क्रमांक ०११३९ नागपूर-मडगाव एक्स्प्रेस करमळी स्थानकाच्या आधी ७० मिनिटांसाठी थांबवण्यात येणार आहे. सुमारे एक ते दोन तास रेल्वेगाड्यांना थांबा दिल्याने इतर रेल्वेगाड्या देखील विलंबाने धावतील.

# पानगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना धिरज देशमुख यांच्याकडून अभिवादन

## राज्याच्या वेगवेगळ्या भागातील हजारो अनुयायांची उपस्थिती







दैनिक आपला विदर्भ

**रेणापूर/प्रतिनिधी** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त लातूर ग्रामीण मधील पानगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान गौतम बुद्धांच्या पवित्र अस्थींचे लातूर ग्रामीणचे माजी आमदार, काँग्रेसचे सरचिटणीस श्री धिरज विलासराव देशमुख यांनी दर्शन घेऊन अभिवादन केले.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त पानगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या अस्थी अभिवादन कार्यक्रमास उपस्थित राहून राज्याच्या वेगवेगळ्या भागातून आलेल्या नागरिकांशी श्री धिरज विलासराव देशमुख यांनी संवाद साधला. यावेळी चंद्रचूड चव्हाण, सर्जे राव मोरे, प्रमोद जाधव, व्ही. के. आचार्य, सुरेश लहाने, विश्र्वासराव देशमुख, रमेश सूर्यवंशी, उषा कांबळे, प्रभाकर केंद्रे, अनंत लांडगे, मोहन माने, शिवाजी आचार्य, उत्तरेश्र्वर हलकुडे, विवेक चव्हाण, सिद्धेश्र्वर गालफाडे, उमर पठाण, अभिजीत चव्हाण, किरण हनवते, गणेश चव्हाण, गुलाब चव्हाण, रघुनाथ शिंदे, वैभव आचार्य, ललिता कांबळे, मीना मोटाडे, विश्र्वनाथ कागले, प्रकाश सूर्यवंशी, गोविंद जाधव, भैया आचार्य, हरी रामरूळे, जयदीप आचार्य, आर. के. आचार्य आदींसह आंबेडकरी विचाराचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री. धिरज विलासराव देशमुख म्हणाले की, लातूरचे माजी पालकमंत्री तथा आमदार श्री अमित विलासराव देशमुख यांच्या प्रयत्नांतून पानगाव येथील चैत्यस्मारक विकसित झाले. आम्हीही या पवित्र अस्थी स्थळाच्या विकासासाठी प्रयत्न केले. येणाऱ्या काळात सर्वांना सोबत घेऊन विकासासाठी कार्यरत राहू.

पानगाव परिसरातील या अस्थीस्थळाचे राज्यस्तरीय तीर्थस्थळ व्हावे, असा येथील जनतेचा मानस होता, त्याला अनुसरून येथे चैत्यस्मारक उभारण्यात आले. या स्मारकासाठी अमित देशमुख यांचे मोलाचे सहकार्य लाभले. येथील अस्थीस्थळाच्या विकासासाठी आम्ही जिल्हाधिकारी महोदयांच्या माध्यमातून वारंवार बैठका घेऊन पाठपुरावा केला. डॉ. बाबासाहेबांच्या अनुयायांना व येथील नागरिकांना अपेक्षित विकास करण्यासाठी आम्ही यापुढेही पूर्ण प्रयत्न करू, असे श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी सांगितले.

# केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत वाशिम येथे ७ डिसेंबरला होणार राज्यस्तरीय १०० दिवशीय क्षयरोग मुक्त भारत मोहीमेचा शुभारंभ

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** :राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत १०० दिवशीय क्षयरोग मुक्त भारत मोहीमेचा राज्यस्तरीय शुभारंभ केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते ७ डिसेंबरला वाशीम येथे होणार आहेत

जास्तीत जास्त क्षयरोग रुग्ण शोधून त्यांना उपचाराखाली आणणे, क्षयरुग्णांचा मृत्यूदर कमी करणे, नवीन क्षयरुग्णांचे प्रमाण कमी करणे, वंचित व अतिजोखमीच्या घटकापर्यंत पोहोचून आरोग्य सेवा पुरवणे, क्षयरोगाविषयी जनजागृती करणे, क्षयरोगाविषयी समाजातील भीती, अनिष्ट रूढी परंपरा, भेदभावाची वागणूक कमी करण्यासाठी उपक्रम राबविणे, निक्षयमित्र यांचेकडून पोषण आहार कीटचे वाटप करणे हा उद्देश डोळ्या समोर ठेवुन राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत १०० दिवशीय क्षयरोग मुक्त भारत मोहीमेचे आयोजन केंद्र सरकारच्या वतीने करण्यात आले आहे

या माहिमेचा शुभारंभ ७ डिसेंबरला केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी.नड्डा यांचे हस्ते व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे होणार



आहे. तर राज्यस्तरावरून या मोहिमेचा शुभारंभ त्याच दिवशी आयुष विभागाचा स्वतंत्र प्रभार असलेले आणि आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्याहस्ते वाशीम येथिल कार्यक्रमातुन होणार आहे. १०० दिवशीय क्षयरोग मुक्त भारत मोहीम देशभरातील ३४७ जिल्ह्यांमध्ये ही मोहीम राबविण्यात येणार आहे महाराष्ट्र राज्यातील १७ जिल्हे आणि मुंबईसह एकूण १३ महानगरपालिकामध्ये ही मोहीम राबविण्यात येणार आहे

या मोहिमेचा एक भाग प्रतिबंधात्मक उपायोजना म्हणून प्रौढ बी.सी.जी. लसीकरण मोहीमेची व्याप्ती वाढविण्यात येणार असून त्यामध्ये कोमॉर्बीड रुग्ण, रोगप्रतिकारक शक्ती कमी असेलेल्या व्यक्ती, धुम्रपान करणाऱ्या व्यक्ती, ६० वर्षावरील सर्व व्यक्ती यांना त्यांचे संमतीने प्रौढ बी.सी.जी. लसीकरण करण्यात येणार आहे. तसेच पल्मोनरी क्षयरुग्णांच्या संपर्कातील पात्र व्यक्तींची सी.वाय.टीबी तपासणी करून त्यात पॉझिटिव्ह येणा-या व्यक्तींना टीपीटी चालू करण्यात येणार आहे. या मोहिमेत सर्वांनी सक्रीय सहभाग नोंदवुन क्षयरोग मुक्त भारत करण्यासाठी पुढे या अस आवाहन केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आहे

# जिवंत लाभार्थ्यांना मृत घोषीत दाखवून केले अनुदान बंद

## मेहकर तालुक्यातील खळबळजनक प्रकार



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : जिवंत लाभार्थ्यांना मृत घोषीत करून अनुदान बंद करण्यात आल्याचा खळबळजनक आणि संतापजनक प्रकार मेहकर तहसील कार्यालयात समोर आला आहे.या प्रकाराने मात्र मेहकर तहसील कार्यालयातील भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे.

मेहकर तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेतंर्गत लाभ मिळत असलेल्या काही लाभार्थ्यांना मिळणारा लाभ अचानक बंद झाल्याच्या तक्रारी शिवसेनेला प्राप्त झाल्या.या बाबत मेहकर तहसील कार्यालयात चौकशी करण्यासाठी शिवसैनिक गेले असता मेहकर तहसील कार्यालयात सदर लाभार्थी मयत असल्याने सदर अनुदान बंद करण्यात आले असल्याचा गंभीर प्रकार समोर आला.

वास्तविक सदर सर्व लाभार्थी हे जिवंत असतानाही मयत दाखविण्यात आले आहेत. त्यामुळे सदर प्रकरणाची आपण सखोल चौकशी करून लाभार्थ्यांचा बंद केलेला लाभ पुन्हा सुरू करावा, अशी मागणी शिवसेनेचे पदाधिकारी तथा मेहकर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अड्. रामेश्र्वर सदाशिव पळसकर यांनी डोणगाव येथील तहसीलदार यांना दि.५ डिसेंबर रोजी निवेदनाद्वारे केली आहे.



## चैत्यभूमीवर ‘ईव्हीएम’विरोधात स्वाक्षरी मोहीम; भारतीय विद्यार्थी मोर्चाचा फलकाद्वारे निषेध

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील विधानसभा निवडणुकीत महायुतीने स्पष्ट बहुमत मिळवून सरकार स्थापन केले. निवडणुकीत महाविकास आघाडीला पराभवाचा धक्का सहन करावा लागला. दारुण पराभव पत्करावा लागलेल्या विरोधकांनी ‘ईव्हीएम’वर संशय व्यक्त करून निवडणूक प्रक्रियेला लक्ष्य केले आहे. वंचित बहुजन आघाडीनेही महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने दादर शिवाजी पार्क येथे ‘ईव्हीएम’विरोधी स्वाक्षरी मोहीम राबविली. तसेच भारतीय विद्यार्थी मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी ‘ईव्हीएम’विरोधी आशय लिहिलेले फलक हाती घेऊन निषेध केला.

विधानससभा निवडणुकीत एकही जागा जिंकू न शकलेल्या वंचित बहुजन आघाडीतर्फे ३ ते १६ डिसेंबरदरम्यान राज्यात ‘ईव्हीएम’विरोधी जनआंदोलन स्वाक्षरी मोहीम हाती घेण्यात आली आहे. त्यानुसार महापरिनिर्वाणदिनी शिवाजी पार्कात ईव्हीएमविरोधी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. ‘देशातील एक जबाबदार नागरिक आणि एक सुजाण मतदार म्हणून माझा ईव्हीएमवर अजिबात विश्र्वास नाही. निवडणूक ही ईव्हीएमवर न घेता पुन्हा मतपत्रिकेवर (बॅलेट पेपर) झाली पाहिजे, या मागणीला माझा पूर्ण पाठिंबा आहे’, असा मजकूर लिहिलेल्या भव्य फलकावर महापरिनिर्वाण दिनासाठी आलेल्या नागरिकांनी स्वाक्षरी केली.

भारतीय युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी ‘ईव्हीएम हटाओ; लोकतंत्र बचाओ’, ‘गाव गाव में शोर है चुनाव आयोग चोर है’, अशा आशयाचे फलक हाती घेऊन ‘ईव्हीएम’विरोधात निदर्शने करून मतपत्रिकेचे महत्त्व पटवून देण्यात आले. तसेच भारतीय युवा मोर्चातर्फे ‘मेरी पढाई; मेरे समाज के लिए’, ‘शाळा वाचवा-शिक्षण वाचवा-मुलांचे भविष्य वाचवा’, असे फलक झळकावण्यात आले.

देशभरातील जनता ही ‘ईव्हीएम’च्या विरोधात आहे. जनता सार्वभौम असल्यामुळे तिच्या मताचा आदर राखून निवडणूक आयोगाने मतपत्रिकेच्या माध्यमातून मतदान घ्यावे. ‘ईव्हीएम’विरोधी मोहीम गेल्या १४ वर्षांपासून भारतभर सुरू आहे.

**- राकेश गायकवाड,**
**राज्य संयोजक, भारतीय विद्यार्थी मोर्चा**

# क्षयरोग निर्मूलनसाठी मुंबईमध्ये राबविणार ‘१०० दिवस मोहीम’

## २६ प्रभागांमध्ये आजपासून मोहीम सुरू होणार

दैनिक आपला विदर्भ

मुंबई : राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत मुंबईतील २६ प्रभागांमध्ये ७ डिसेंबर २०२४ पासून २४ मार्च २०२५ पर्यंत ‘१०० दिवस मोहीम’ राबवण्यात येणार आहे. क्षयरोग रुग्ण शोधण्याची गती वाढविणे, क्षयरोगाचा मृत्यू दर कमी करणे, क्षयरोगाचा प्रसार कमी करून नवीन क्षयरुग्ण टाळणे हे मोहिमेचे उद्दिष्ट असणार आहे.

भारत सरकारने २०२५ अखेर देशातून क्षयरोगाचे निर्मूलन करण्याचे ध्येय ठेवले. त्याअनुषंगाने केंद्रीय क्षयरोग विभागाच्या सूचनेनुसार संपूर्ण भारतात आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार मुंबईतील २६ प्रभागांमध्ये ७ डिसेंबर २०२४ पासून २४ मार्च २०२५ पर्यंत १०० दिवस मोहीम राबवण्यात येणार आहे. यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे सर्व प्रभागांच्या अधिकाऱ्यांचे दृकश्राव्य प्रणालीद्वारे संवेदीकरण करण्यात आले. यामध्ये २०० पेक्षा अधिक वैद्यकीय अधिकारी सहभागी झाले होता. सर्व संबंधित प्रभागांना मोहिमेबाबत सूचना करण्यात आल्या. तसेच संबंधितांना प्रभागस्तरावर प्रशिक्षण देण्यात आले आहे. ७ डिसेंबर २०२४ रोजी मार्गदर्शक सूचनेनुसार मोहिमेचा प्रभाग स्तरावर शुभारंभ करण्यात येणार आहे.

या मोहिमेदरम्यान विभागनिहाय अतिजोखमीच्या लोकसंख्येचे आणि क्षयरुग्णांचे मॅपिंग करण्यात येणार आहे, अतिजोखमीच्या व्यक्तींची नॅट व ‘एक्स रे’च्या मदतीने क्षयरोगासाठी तपासणी करण्यात येईल. तसेच क्षयरोग निदान झालेल्या व्यक्तींवर त्वरित व योग्य उपचार करण्यात येणार आहेत. क्षयरोग निदान झालेल्या व्यक्तींना पोषणासाठी निक्षय पोषण योजनेचा लाभ तसेच निक्षय मित्र बनवून पोषणासाठी सहाय्य देण्यात येईल. तसेच, क्षयरोग नसलेल्या परंतु क्षयरुग्णाच्या संपर्कात असलेल्या व्यक्तींना क्षयरोग प्रतिबंधित उपचार देण्यात येणार आहेत.

जनभागीदारीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन ७ डिसेंबर २०२४ ते २४ मार्च २०२५ या कालावधीत निक्षय शिबिर, विविध स्पर्धा आणि कार्यक्रमांद्वारे शाळा व महाविद्यालयांमधील युवकांचा सहभाग, निक्षय सप्ताहाचे आयोजन, निक्षय प्रतिज्ञेचे वाचन तसेच विविध उत्सवादरम्यान क्षयरोगाबद्दलची जनजागृती जिल्हा क्षयरोग अधिकारी यांच्या पथकाद्वारे करण्यात येणार आहे.

ही मोहीम जन भागीदारितून यशस्वी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाव्यतिरिक्त, इतर विभाग, वैद्यकीय महाविद्यालये, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, खासगी उद्योग उपक्रम, नागरी संस्था, स्वयं-सहाय्य गट, सहकारी आणि इतर समुदाय स्तरावरील संघटना यांनी सक्रिय आणि सहयोगी सहभाग घेण्यासाठी आवाहन मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे.

अति जोखमीच्या लोकसंख्येमध्ये ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, मधुमेही, एच.आय.व्ही. धूम्रपान करणारे, कुपोषित व्यक्ती, क्षयरुग्णांच्या संपर्कातील व्यक्ती, कर्करोग रुग्ण यांचा समावेश होतो. तसेच दोन आठवड्यांपेक्षा जास्त खोकला, ताप, रात्री घाम येणे, छातीत दुखणे, थकवा येणे, वजन कमी होणे, शरीराच्या कोणत्याही भागात गाठ येणे, नुकतेच शारीरिक बदल, बेडक्यामध्ये रक्त येणे, जुना आजार यापैकी कोणतेही लक्षण आढळल्यास जवळच्या परिसरातील मुंबई महानगरपालिकेच्या दवाखान्यात किंवा हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे उपलब्ध सार्वजनिक आरोग्य सेवांचा लाभ घ्यावा.

# आ. सिद्धार्थ खरात यांचे महामानवाला अभिवादन

## अशोक वाटिका येथे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीही केले अभिवादन





दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांनी मेहकर येथील अशोक वाटिका येथे जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६ डिसेंबर १९५६ रोजी महानिर्वाण झाले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण दीनदुबळ्यासोबतच संपूर्ण माणव जातीच्या उद्धारासाठी कार्य केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते.अशा या महामहानवाच्या परिनिर्वाण दिनानिमित्त दि.६ डिसेंबर रोजी संपूर्ण मेहकर शहरातील अशोक वाटिका येथे अभिवादन करण्यासाठी हजारो अनुयायांची गर्दी उसळली होती. निवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांनीही अशोक वाटिका येथे जाऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. यावेळी त्यांच्यासोबत पदाधिकारी व शेकडो कार्यकर्त्यांनी सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

## विविध वृत्त...

### बुलढाण्यात रक्तदान शिबिराचे आयोजन करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन






दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** :भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज ६८ वी पुण्यतिथी साजरी केली जात आहे. समाजसुधारक, अर्थतज्ज्ञ, विचारवंत, राजकारणी आणि स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री भीमराव आंबेडकर यांनी ६ डिसेंबर १९५६ रोजी अखेरचा श्वास घेतला होता. हाच दिवस भारतात महापरिनिर्वाण दिवस म्हणून साजरा केला जातो.

आज महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादनासाठी बुलढाण्यातील जयस्तंभ चौकात नागरिकांनी गर्दी केली होती. गेल्या १३ वर्षापासून महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानव ग्रुपच्या वतीने रक्तदान करून अभिवादन केले जात आहे. बुलढाणा शिवसेना आमदार संजय गायकवाड यांचे पुत्र कुणाल गायकवाड, शिवसेना ठाकरे गटाचे नेते दत्तात्रय लहाने, काँग्रेसचे दत्ता काकस यांसह अन्य क्षेत्रातील नागरिकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले आहे.

### कँडल मार्च काढून महामानवाला अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अमरावती शहरातील विविध भागातून सायंकाळी कँडल मार्च काढून महामानवाला अभिवादन करण्यात आले. यावेळी हजारोंच्या संख्येने अनुयायी या कँडल मार्चमध्ये सहभागी होऊन शिस्तबद्ध पद्धतीने प्रत्येक महिला, पुरुषांनी पांढरे वस्त्र परिधान केले होते. तसेच प्रत्येक अनुयायाच्या हातामध्ये पेटलेली कँडल होती. अशाच प्रकारचा कँडल मार्च अमरावती शहरातील महाजनपुरा येथून आणि भीम नगर, विलास नगर, सिद्धार्थ नगर, शेगाव नाका, पंचवटी मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पोहचला. याठिकाणी असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून महामानवाला अभिवादन करण्यात आले.

### महाराष्ट्र धर्माला तडा गेला तर आम्ही रस्त्यावर उतरू ; यशोमती ठाकूर यांचा इशारा



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी** : समाजामध्ये विभाजन केले जात आहे,जातिवाद सुरू आहे. दादागिरी करून निवडणुका जिंकल्या जात आहेत. आमच्यासाठी आमचा देश, आमचे संविधान महत्त्वाचे आहे, संविधान कटिबद्ध राहिले पाहिजे,सत्ताधाऱ्यांनी महाराष्ट्र धर्म सांभाळावा अशी त्यांच्याकडून अपेक्षा आहे. अन्यथा महाराष्ट्र धर्मासाठी आम्ही रस्त्यावर उतरू असा इशारा काँग्रेसच्या नेत्या यशोमती ठाकूर यांनी माध्यमांशी बोलताना दिला.

यावेळी यशोमती ठाकूर म्हणाल्या की, मारकड वाडीमध्ये त्यांनी बॅलेट पेपरवर का मतदान होऊ दिले नाही ?असा प्रश्र्नही यावेळी त्यांनी केला. सत्ताधाऱ्यांनी जर चोरी केली नाही तर मारकडवाडीमध्ये बॅलेट पेपरवर मतदान का होऊ दिले नाही ? असा मोठा प्रश्र्न निर्माण होत आहे. लोकशाहीच्या रक्षणासाठी राहुल गांधी रस्त्यावर उतरतील आम्ही देखील त्यांच्यासोबत राहू,आता काय काय जुमले होते, हे नंतर लोकांना कळेल. सत्ताधाऱ्यांनी २१०० रुपये लाडक्या बहिणींना देण्याचा आश्वासन दिले ते उद्यापासून द्यायला पाहिजे जनता त्यांना याचे उत्तर देईल.तर महाराष्ट्र धर्माला तडे गेले तर आम्ही रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही,असा इशारा काँग्रेसच्या नेत्या यशोमती ठाकूर यांनी दिला.